MHTH120001172017

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०७ | ०१ | २०१७ |
| नोंदणी तारीख | : | ०७ | ०१ | २०१७ |
| निकाल तारीख | : | ०६ | ०५ | २०२५ |
| **कालावधी** | : | **०८ व.** | **०३ म.** | **३० दि.** |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र. ३) बेलापुर यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी श्रीमती एम.एम.मोरे/पावडे यांचे समक्ष)**

**नियमित फौजदारी खटला क्र. २०/२०१७** **निशाणी क्र. (३२)**

| | |
|---|---|
| | गुन्हा क्र : ।। २६९/२०१६<br>पोलिस स्टेशन : एपीएमसी, |
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलिस स्टेशन, एपीएमसी, पोलीस ठाणे. |
| अधिवक्ता | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. अरुण फाटके. |
| आरोपी | **१. मलजीतसिंग इंद्रजितसिंग सुरी.**<br>वय– ५१, व्यवसाय– व्यापार<br>रा. ११०१, वाईक लोटस, सेंट फ्रूनसेस लेन, सांताक्रुझ, मुंबई. |
| अधिवक्ता | आरोपीतर्फे वकील श्री. ए.एन.जगताप |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | दि.३१/१०/२०१६ ते<br>दि.०३/११/२०१६ रोजी |
| प्रथम खबरी तारीख | ०३/११/२०१६ |

| | |
|---|---|
| आरोपपत्राची दाखल तारीख | ०३/०१/२०१६ |
| आरोपपत्र निश्चित केल्याची तारीख | २०/०८/२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | २१/०२/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६/०५/२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर असेल तर | निरंक |

| क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | आरोपीने केलेले गुन्हे | निर्दोष किंव्हा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४२८ फौ.प्र.सं च्या उद्देशाने खटलेच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मलजीतसिंग इंद्रजितसिंग सुरी. | २०/१२ /२०१६ | २०/१२ /२०१६ | कॉपीराईट ॲक्ट चे कलम ५१, ६३,६५ व कलम १०३, १०४ अन्वये ट्रेड मार्क ॲक्ट | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अन्वये | | | |

## <u>न्या य नि र्ण य</u>
## (घोषणा दिनांक ०६ मे, २०२५)

आरोपी हे कॉपीराईट ॲक्ट चे कलम ५१, ६३,६५ व कलम १०३, १०४ अन्वये ट्रेड मार्क ॲक्ट अन्वये निश्चित केलेल्या दोषारोपाच्या संपरिक्षेसाठी प्रस्तुत खटल्यात सामोरे गेले आहेत.

**<u>अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.</u>**

**०२.** घटना दि.३१/१०/२०१६ रोजी ते दि.०३/११/२०१६ रोजी दरम्यान बी के एक्सपोर्ट, प्लॉट नं.६६, सेक्टर नं.१९, सी, एपीएमसी, वाशी, नवी मुंबई येथे घडली. आरोपीत यांनी एफ अे जी इंडिया लि. कंपनी, मुंबई यां कंपनीचे फॅग असे डयुप्लीकेट स्वामित्व चिन्ह तयार करुन ते बेअरींगवर उमटवून सदरच्या बेअरींग उच्च प्रतीच्या व एफ अे जी कंपनीच्या असल्याचे भासवुन तसेच सदर कंपनीची स्वामित्व चिन्हाबाबत कोणतेही पुर्व परवानगी न घेता नकली स्वामित्व चिन्हांची बेअरींगवर छपाई करुन सदरचा बेअरींग कमी किंमतीत विकुन, सदरच्या बनावट बेअरींग स्वतःचे कब्जात बाळगुन एफ अे जी कंपनीचे व ग्राहकांचे नुकसान केले. म्हणून फिर्यादीने आरोपीविरुध्द प्रस्तुत घटनेची फिर्याद नोंदविली.

**०३.** सदरच्या फिर्यादवरुन आरोपीविरूध्द गुन्हा क्रमांक–I २६९/२०१६ कॉपीराईट ॲक्ट चे कलम ५१, ६३,६५ व कलम १०३, १०४ अन्वये ट्रेड मार्क ॲक्ट अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान तपासी अधिकारी श्री.

डी. एच.कादबाने यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपीला अटक केली.

**०४.** आरोपींविरूध्द नि.क्र.२५ अन्वये दोषारोपपत्र आरोपींना त्यातील मजकूर वाचून व समजावून दाखविले. त्यांनी नि.क्र.२६ अन्वये दोषारोप अमान्य करुन खटला चालविण्याची मागणी केली. आरोपीविरूध्द गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर नसल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये बयान नोंदविण्यात आलेले नाही.

**०५.** सरकार पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणांसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दि.३१/१०/२०१६ रोजी ते दि.०३/११/२०१६ रोजी दरम्यान बी. के एक्सपोर्ट, प्लॉट नं.६६, सेक्टर नं.१९, सी, एपीएमसी, वाशी, नवी मुंबई येथे आरोपी व पाहीजे आरोपी यांनी आपसात संगणमत करुन एफ अे जी इंडिया लि. कंपनीचे फॅग असे डयुप्लीकेट स्वामित्व चिन्ह तयार करुन ते बेअरींगवर उमटवून सदरच्या बेअरींग उच्च प्रतीच्या व एफ अे जी कंपनीच्या असल्याचे भासवुन तसेच सदर कंपनीची स्वामित्व चिन्हाबाबत कोणतेही पुर्वपरवानगी न घेता नकली स्वामित्व चिन्हांची बेअरींगवर छपाई करुन सदरचा बेअरींग कमी किंमतीत विकुन, सदरच्या बनावट बेअरींग स्वतःचे कब्जात बाळगुन एफ.अे.जी कंपनीचे व ग्राहकांचे नुकसान केले व असे | ....नकारार्थी |

करुन तुम्ही कॉपीराईट ॲक्ट कलम ५१, ६३ सह ट्रेडमार्क ॲक्ट कलम १०३, १०४ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला ?

२. काय आदेश ? अंतिम आदेशानुसार

: : **का र ण मि मां सा** : :

**मुद्दा क्रमांक ०१ करिता:–**

**०७.** अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ दिपक हरीभाउ कादबने, तपासी अधिकारी असल्याने त्यांचा पुरावा अभिलेखावर सर्वप्रथम घेण्यात येतो. साक्षीदार क्र.२ यांनी आपल्या पुराव्यात कथन केले की, नोव्हेंबर–२०१६ मध्ये ते एपीएमसी पोलिस ठाणे येथे पो. उप.निरीक्षक या पदावर कार्यरत असतांना दि.०३/११/२०१६ रोजी टॅन्क इंडीया कंपनीचे अधिकारी यांनी डीसीपी क्राईम नवी मुंबई यांना तक्रारी अर्ज दिला की, त्यांच्याकडे फॅग नावाचे ट्रेडमार्क डयुप्लीकेट स्वरूपात वापरत होते. यापुढे साक्षीदार क्र.२ ने कथन केले की, डी.सी.पी यांच्या आदेशान्वये त्यांनी कारवाई केली. त्यामध्ये दोन पंचांना बोलवून एपीएमसी परीसरामध्ये डी.के.एक्सपोर्ट प्लॅाट नं. ६६, सेक्टर–१९, एपीएमसी, वाशी नवी मुंबई या ठिकाणी गेले असता त्यांना २३ फॅग ऑस्ट्रीया असे ट्रेडमार्कचे २३बॉक्स व त्यामध्ये ९२ बेअरींग आढळून आल्या. यापुढे साक्षीदार क्र.२ ने कथन केले की, सदर बेरींगची पाहणी केली असता फॅग कंपनीचे अधिकारी फैजल त्यागी व सुहास कुलकर्णी यांनी पाहण केली व सदरचे फॅग ऑस्ट्रीया ट्रेड मार्क हे डयुप्लीकेट असल्याचे त्यांना आढळून आले. यापुढे साक्षीदार क्र.२ ने कथन केले की, त्यानंतर त्यांनी दोन पंचांसमक्ष नि.क्र.३२ अन्वये जप्ती पंचनामा केला. मुददेमाल

आरोपीसहीत पोलिस ठाण्यात हजर केला. त्यानंतर नि.क्र.३३ अन्वये फिर्याद व नि.क्र. ३४ अन्वये प्रथम खबरी अहवाल दाखल केला. यापुढे साक्षीदार क्र.२ ने कथन केले की, त्यानंतरचा तपास त्यांनी केला त्यानंत साक्षीदारांचे जबाब नोंदविले. जप्त केलेल्या बेरींगचे नमुमे फॅग कंपनीकडे आर्टिकल ब अन्वये पाठविले. तपासाअंती आरोपीविरूध्द सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र तयार करून न्यायालयात दाखल केले.

**०८.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीत साक्ष्‍ाीदार क्र.२ ने कथन केले की, जप्त केलेल्या बेअरींग बाजारात सहजरीत्या मिळू शकतात. तसेच सदरील बेरींग हया कोणी व कोठे तयार केल्या यांचा तपास केला असता त्यांना कोणीही मिळून आले नाही.

**०९.** अभियोग पक्षाचे फिर्यादी साक्षीदार क्र.१ साजाद मुशीबद खान यांची साक्ष नि.क्र. २९ वर नोंदवली. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने त्यांची न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासणी केली त्यामध्ये देखील साक्षीदाराने विचारलेल्या सर्व प्रश्नांवी नकारार्थी उत्तरे दिली. त्यामुळे या साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त नाही.

**१०.** अभिलेखावरील एकंदरीत पुराव्याचे अवलोकन केले असता, असे प्रतीत होते की, सदर प्रकरणात फिर्यादी फैसल फैयास त्यागी यांना वारंवार समन्स काढून देखील अभियोग पक्ष त्यांची साक्ष अभिलेखावर नोंदवू शकले आहे. तसेच नि.क्र. ३१ वरील पत्रानुसार असे दिसून येते की, फिर्यादी नमुद पत्त्यावर उपलब्ध नाही तसेच त्यांचा मोबाईल क्र. ९६५०२४४३०० हयावर देखील संपर्क होत नाही. त्यामुळे अभिलेखावर फिर्याद सिध्द झाली नाही. तपासी अंमलदार यांच्या पुराव्याचे अवलोकन

केले असता असे दिसून येते की, जप्त करण्यात आलेल्या बेरींग हया बाजारात सहजपणे मिळू शकतात. तसेच त्यावर असलेल्या स्वामीत्व चिन्हाची अभियोग पक्षामार्फत कोणतीही तपासणी करण्यात आलेली नाही. अथवा सदर बेरींग हे साक्षीदार क्र.२ यांना त्यांच्या साक्षी दरम्यान पडताळणी करीता अभियोग पक्षाने दाखविले नाही. त्यामुळे जप्त करण्यात आलेले फॅग कंपनीचे डयुप्लीकेट स्वामीत्व चिन्ह असलेले बेरींग आरोपीने कोणतीही पुर्व परवानगी न घेता तयार केले असे उपलब्ध पुराव्यावरून सिध्द होत नाही. सदरील प्रकरण हे २०१७ चे असून ८ वर्षे जुने आहे. आजतागायत अभियोग पक्षाने साक्षीदारांस वारंवार समन्स साक्षी समन्स काढले परंतु साक्षीदार उपलब्ध पत्तयावर मिळून आले नाही. अभिलेखावर उपलब्ध असलेला पुरावा अत्यंत तोकडया स्वरूपाचा आहे. त्यामुळे आरोपीने सदरचा अपराध केला आहे असे उपलब्ध पुराव्यावरून सिध्द होत नाही. सबब, मुददा क्र.१ ला नकारार्थी निष्कर्ष नोंदविण्यात येतो.

**<u>मुद्दा क्र.२ बाबतः –</u>**

**११.** अभियोग पक्ष आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यास पुर्णपणे अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून आरोपींची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचीत वाटते. परिणामतः मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते–

**: आ दे श :**

**०१.** आरोपी मलजीतसिंग इंद्रजितसिंग सुरी यांना कॉपीराईट ॲक्ट चे कलम ५१, ६३,६५ व कलम १०३, १०४ ट्रेड मार्क ॲक्ट अन्वये दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता

करण्यात येते.

०२. आरोपीचे जामीन कदबे रद्द करण्यात येते.

०३. आरोपींचे कलम ४३७(अ) प्रमाणे रुपये १५,०००/–रुपयाचे बंधपत्र रदद् समजण्यात यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.)

MANGAL MAHESH MORE

Digitally signed by MANGAL MAHESH MORE
Date: 2025.05.08 13:36:08 +0530

**(एम.एम.मोरे/पावडे)**

**दिनांक :०६.०५.२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.३),**
**बेलापूर, नवी मुंबई.**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word to word, as per the assigned Judgment.

Name of Stenographer :- S. P. Nagrale

Court :- Judicial Magistrate, F.C. (Ct. No.3)

Judgment signed by the Presiding Officer on :- 06-05-2025

Judgment uploaded on :- 08-05-2025